**ठळक बातम्या**

- विविध पिकांचे दीड हजार पर्यावरणस्नेही वाण येत्या ५ वर्षात उपलब्ध करुन देण्यासाठी सरकार प्रयत्नशील / १०९ वाणांचं लोकार्पण लवकरच प्रधानमंत्र्यांच्या हस्ते होणार
- मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला आव्हान देणारी जनहित याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली
- राज्यात जोरदार पावसामुळे पाणीपातळी वाढल्यानं अनेक धरणांमधून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग

**आणि**

- शेअर बाजारात मोठी पडझड/ सेन्सेक्समध्ये २ हजार २२३, तर निफ्टीमध्ये ६६२ अंकांची घसरण

**<><><><><>**

विविध पिकांचे दीड हजार पर्यावरण स्नेही वाण येत्या ५ वर्षात उपलब्ध करुन देण्यासाठी सरकार प्रयत्नशील असून अशा १०९ वाणांचं लोकार्पण लौकरच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार असल्याचं केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंग चौहान यांनी आज राज्यसभेत सांगितलं. फलोत्पादन निर्यातीचं उद्दिष्ट ठेवून पुढच्या ५ वर्षात देशभरात शंभर फलोद्यानं विकसित केली जाणार असून त्याकरता १८ हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे असं ते म्हणाले. शेती फायद्याची करण्यासाठी वेगळा दृष्टिकोन अंगीकारण्याची गरज आहे असं सांगून, खतांच्या वाढत्या वापराबद्दल त्यांनी चिंता व्यक्त केली. सरकार सेंद्रीय शेतीला प्रोत्साहन देत आहे, असं ते म्हणाले. शेतकऱ्यांना आधारच्या धर्तीवर ओळखपत्र जारी करण्याचा

विचार त्यांनी बोलून दाखवला. सरकार शेतकरीविरोधी असल्याच्या विरोधकांच्या टीकेवर त्यांनी ताशेरे ओढले. शेतकऱ्यासाठी प्रधानमंत्री किसान सन्मान निधीतून दिल्या जाणाऱ्या ६ हजार रुपये अर्थसहाय्याचं मोल विरोधकांना कळणार नाही, असं ते म्हणाले.

**<><><><>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेला आव्हान देणारी जनहित याचिका आज मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळली. ही योजना राजकीयदृष्ट्या प्रेरित असून या योजनेच्या माध्यमातून सर्वसामान्य करदात्यांच्या पैशांचा अपव्यय होत आहे, असा आरोप करत नवी मुंबईतले सनदी लेखापाल नावेद मुल्ला यांनी ही याचिका दाखल केली होती. या याचिकेवर आज मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमूर्ती अमित बोरकर यांच्या समोर सुनावणी झाली. सरकारनं कोणती योजना तयार करावी किंवा ती प्राधान्यानं राबवावी ही बाब न्यायालयाच्या कार्यक्षेत्रात येत नाहीत. हा सरकारचा धोरणात्मक निर्णय असून त्यात न्यायालय हस्तक्षेप करू शकत नाही, असं स्पष्ट करून न्यायालयानं ही याचिका फेटाळली.

केवळ विरोधासाठी या योजनेला दिलेलं आव्हान उच्च न्यायालयानं फेटाळल्यानं या योजनेची विश्वासार्हता अधिकच वाढली आहे, अशी प्रतिक्रिया महिला आणि बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या संदेशात दिली आहे.

तर, ही याचिका मुंबई उच्च न्यायालयानं फेटाळून लावल्यानं विरोधकांना चपराक बसली असल्याचे शिवसेना पक्षाच्या प्रवक्त्या डॉ.मनीषा कायंदे यांनी म्हटलं आहे.

**<><><><>**

बांगलादेशात सुरू असलेल्या हिंसाचाराच्या पार्श्वभूमीवर बांगला देशाच्या प्रधानमंत्री शेख हसीना यांनी राजीनामा दिला आहे. ढाक्यातलं प्रधानमंत्र्यांचं अधिकृत निवासस्थान गोनोभवनवर आज शेकडो आंदोलकांनी हल्ला केला. त्यानंतर शेख हसीना देश सोडून लष्कराच्या हेलिकॉप्टरनं सुरक्षित स्थळी निघून गेल्याचं वृत्त आहे. देश चालवण्यासाठी अंतरिम सरकार स्थापन केलं जाईल, असं बांगलादेशाचे लष्करप्रमुख जनरल वकार-उझ-झमान यांनी म्हटलं आहे. दूरचित्रवाणी वरून संबोधित करताना त्यांनी देशवासियांना संयम आणि शांतता राखण्याचं आवाहन केलं आहे. दरम्यान काल पोलीस आणि आंदोलकांमध्ये झालेल्या चकमकीत सुमारे १०० लोक ठार झाले आणि १ हजारहून अधिक जण जखमी झाले.

**<><><><><>**

येणाऱ्या काळात देशाला आणि जगाला कौशल्यपूर्ण मनुष्यबळ आपला महाराष्ट्र देणार आहे. त्यामुळे उत्तमोत्तम कौशल्य असलेली पिढी घडविण्यासाठी शिक्षणावर जास्त खर्च करायचा आहे, असं प्रतिपादन उच्च आणि तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी जळगावमधल्या अंमळनेर इथं केलं. यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या उपकेंद्राचे भूमिपूजन पाटील यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

**<><><><><>**

राज्यात सामाजिक वातावरण कलुषित झालं असून, जातीय द्वेष निर्माण करणाऱ्यांना माध्यमांनी स्थान देऊ नये, असं, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी आहे. ते आज सोलापूर इथं पत्रकारांशी बोलत होते. मनसे आगामी विधानसभा निवडणूक लढवणार असून, त्या अनुषंगानं निवडणुकीत किती

आणि कशा जागा लढवायच्या हे ठरवण्यासाठी राज्यभर दौरा करणार असल्याचंही ठाकरे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

पुण्यात झिका विषाणूचे आणखी सात नवे रुग्ण आढळले आहेत. या सात नवीन रुग्णांमध्ये कात्रज आणि कोंढवा भागातल्या पाच गर्भवती महिला, एक १८ वर्षीय तरुण आणि एक ४० वर्षीय पुरुषाचा समावेश आहे. संपूर्ण पुणे जिल्ह्यात आतापर्यंत ७२ जणांना झिका विषाणूची लागण झाल्याचा अहवाल जिल्हा आरोग्य विभागानं दिला आहे.

**<><><><><>**

राज्यात अनेक जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस झाला असून अनेक धरणांमधून मोठ्या प्रमाणावर पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.

गेल्या चोवीस तासात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी मुसळधार पाऊस पडला. येत्या दोन दिवसात कोकणात बहुतांश ठिकाणी, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी, तर विदर्भात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

**पुणे** जिल्ह्यात गेल्या दोन दिवसांपासून सुरू असलेल्या संततधार पावसानं दिलासा दिल्यानं जिल्ह्यातल्या प्रमुख धरणांमधून पाण्याचा विसर्ग कमी करण्यात आल्यामुळं पुणे शहरात निर्माण झालेली पूरस्थिती आता नियंत्रणात आली आहे. या भागांमध्ये कालपासून प्रशासन आणि एनडीआरएफच्या मदतीसाठी आवश्यक बचाव उपकरणांसह लष्करी मदत तैनात करण्यात आली आहे. दरम्यान आज

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुण्यातल्या पूरग्रस्त भागांना भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला.

**नाशिकमध्ये** गेल्या तीन दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू असल्यामुळं जनजीवन विस्कळीत झालं आहे. गिरणा नदीपात्रात आज मासेमारीसाठी गेलेल्या १५ मच्छिमारांची विशेष हेलीकॉफ्टरनं सुटका केली आहे. हे मच्छिमार रविवारी मुठा नदीमध्ये मासे पकडण्यासाठी गेले असताना गंगापुर धरणातून पाणी सोडल्यानं पूरपरिस्थिती निर्माण झाली होती. सध्या गंगापूर धरणातून ८ हजार १००, दारणा धरणातून २२ हजार ३८३ तर नांदूरमध्यमेश्वर इथून ५४ हजार २३३ क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे.

**धुळे** जिल्ह्यातल्या अक्कलपाडा धरणातून काल सायंकाळ पासून पाण्याचा विसर्ग करण्यात येत असल्यानं धुळे शहरातून वाहणाऱ्या पांझरा नदीला पूर आला आहे. महानगरपालिकेनं आतापर्यंत योग्य त्या उपाययोजना केल्या असून स्थानिकांना सुरक्षित स्थळी हलवलं आहे.

**सोलापूर** जिल्ह्यातले उजनी धरण आणि वीर पाणलोट क्षेत्रात सतत सुरु असलेल्या पावसामूळे धरणे शंभर टक्के भरली आहेत. या धरणांमधून मोठ्या प्रमाणात विसर्ग सुरु आहे. उजनी धरणातून संध्याकाळी १ लाख २५ हजार क्युसेक, तर वीर धरणातून ३३ हजार ६०९ क्युसेक पाण्याचा विसर्ग सुरु आहे. त्यामुळे भीमा नदी पात्राच्या पाणी पातळीत वाढ होत असल्यानं नदीकाठच्या नागरिकांना सतर्कता बाळगण्याचं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

पंढरपूर तालूक्यातले पिराची कुरोली, गुरसाळे, पंढरपूर, गोपाळपूर, मुंढेवाडी, पूळूज हे कोल्हापूर पध्दतीचे बंधारे पाण्याखाली गेले आहेत. चंद्रभागा दुथडी भरून

वाहत आहे. त्यामुळे नदीकाठच्या गावांमधल्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

**<><><><><>**

शेअर बाजारात आज मोठी घसरण झाली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स आज २ हजार २२३ अंकांनी घसरून ७८ हजार ७५९ अंकांवर बंद झाला. तर राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टीही ६६२ अंकांची घसरण नोंदवत २४ हजार ५६ अंकांवर बंद झाला. जपानचा शेअर बाजार निक्केई कोलमडल्यानं संपूर्ण जगभरातल्या शेअर बाजारात आज घसरण पाहायला मिळाली. याचा सर्वाधिक प्रभाव आशियातल्या शेअर बाजारांवर दिसून आला. बाजारातली पडझड रोखण्यासाठी दक्षिण कोरियानं २० मिनिटं व्यवहार बंद केले होते. चीन आणि हाँगकाँग यांच्या शेअर बाजारांवर मात्र या पडझडीचा परिणाम दिसून आलास नाही.

**<><><><><>**